# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १२/०९/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील दहेगाव रंगारी येथे दिनांक १०/०९/२०२२ चे १४.०० वा. ते दिनांक ११/०९/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– रंजीत पुंडलिक भास्कर, वय ३८ वर्ष, रा. दहेगाव रंगारी, वार्ड क्र. ४ प्लॉट नंबर ४९० ता. सावनेर हा आपल्या लहान भावाला फेटरी येथे भेटण्याकरिता परिवारासोबत गेला. त्यादरम्यान फिर्यादीच्या घराचा दरवाजाच्या कुलूप व लोखंडी गेटच्या कुलूप अज्ञात आरोनीने घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घराचे देवघर खोलीमध्ये ठेवलेले लोखंडी आलमारीचे लॉक तोडून लॉकर मधील ठेवलेले दागिणीचे डब्यामधून जुने वापरती सोन्या–चांदीचे दागिने किमती ५४,०००/–रु. व नगदी ११,०००/–रु. असा एकुण कि. ६५,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम मो.नं. ९८२३४५३१६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील सिर्सावाडी शिवार येथे फिर्यादी नामे– तुकाराम आंनदराव बाविस्कर वय ५५ वर्ष, रा. सिर्सावाडी यांनी सिर्सावाडी ग्रामपंचायत मधील कोल्हापुरी बंधाऱ्याजवळ बंधारा अडवणाऱ्या प्रत्येकी नग ७५ किलो अशा ७२ लोखंडी पाट्या गोडावुनमध्ये लॉक लावून ठेवले होते. दि ०७/०८/२०२२ रोजी १९.०० वा. दरम्यान गोडावूनची पाहणी केली तेव्हा गोडावूनला लॉक लावले होते. दि ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी शेतामध्ये जात असता गोडावूनची पाहणी केली तर गोडावूनचे दार उघडे दिसले. त्यांनी आत जावून पाहिले असता, तिथे ठेवलेल्या ७२ लोखंडी पाटया (फळया) अंदाजे किंमती ८६,०००/–रू. चा माल दिसला नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने गोडावूनचे दाराचे लॉक तोडून आत प्रवेश करून किंमती ८६,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे मो नं ९०४९६०७११५ या करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील घाटरोहणा येथे दिनांक ०६/०९/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक ०७/०९/२०२२ चे ०४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— चंद्रशेखर गंगया अलगुवार, वय ५१ वर्ष, रा. मच्छीपुरा शास्त्री चौक, कामठी हे संघम सेक्युरिटी सर्विसेस हेडवायझर म्हणुन आय.सी.जी.ई.सी. कंपनी मध्ये २ वर्षापासुन काम करीत आहे. सध्या त्यांचा एम.एस.ई.बी. चा कन्टेनर बेल्टचा काम सुरू असुन कामाचे साहीत्य घाटरोहणा येथे ठेवण्यात आले आहे. दिनांक ०७/०९/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा. दरम्यान फिर्यादी कामावर भेट देण्याकरीता गेले असता सुरक्षा गार्ड रोशन ठके यांनी फिर्यादीस फोन करून सांगितले की, रात्री दरम्यान चोर आले होते व ३२ एमएम रूंदी १२ लांबीचे वजनी ८० किलो वजनाचे ४ रॉड किंमती २५,०००/—रू. चोरून नेले आहे. तेव्हा फिर्यादीने सामान ठेवलेले जागेवर पाहिले असता सदर वर्णनाचे ४ रॉड फिर्यादीला दिसुन आले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नरेश वरकडे मो.नं ९६३७००५३०३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**